# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

### राज्यातील १२ अकृषी विद्यापीठांमधील एम.फिल पात्रताधारक प्राध्यापकांना नेट परीक्षेत सूट देण्याबाबत

**(१) २४८ (२४-०४-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १९६६२ ला दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ अकृषी विद्यापीठाअंतर्गत विविध महाविद्यालयातील दिनांक १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत एम.फिल पात्रताधारक १४४७ प्राध्यापकांच्या नियुक्त्या झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राध्यापकांना नेट परिक्षेमधून सुट देण्यासाठी १५ वर्षापासूनची मागणी करण्यात येत असून एम.फील पात्रताधारक १४४८ प्राध्यापकांचे त्रुटी विरहित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी मा.संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी १२ अकृषी विद्यापीठाना कळवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ जानेवारी.१९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत एम.फील पात्रताधारक १४४८ प्राध्यापकांना नेट परिक्षेमधून सुट देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक १ जानेवारी, १९९४ ते ११ जुलै, २००९ या कालावधीत एम. फील अर्हतेवर नियुक्त झालेल्या अध्यापकांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याबाबत अनेक संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून मागणी करणेत आलेली होती. त्याअनुषंगाने एम. फील अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत संचालनालयास कळविले होते.

तसेच अटींची पूर्तता करणाऱ्या १४४७ अध्यापकांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास सादर करणेबाबत सर्व विद्यापीठाच्या कुलसचिवांना उच्च शिक्षण संचलनालयाने निर्देश दिले होते.
(३) विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र दिनांक २ जुलै, २०२५ व शासनपत्र दिनांक १८/०७/२०२५ अन्वये १४२१ एम. फिल पदवी धारण केलेल्या पात्र अध्यापकांना नेट/सेट परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे.त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना सर्व विभागीय सहसंचालकांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये "सिक रुम" तयार करण्याबाबत

**(२) ४०३ (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाने शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कोणताही आजार झाल्यास "सिक रुम" तयार करुन संबंधित विद्यार्थ्यांना प्रथमोपचार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात माहे नोव्हेंबर,२०२४ ला निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टर अथवा स्थानिक दवाखान्यासोबत ऑनकॉल वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत सामंजस्य करार करण्याचेदेखील निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, किती शाळांनी या निर्देशांचे पालन केले आहे, तसेच उक्त निर्देशाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०६-२०२६) :** (१) व (२) शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीबाबत दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ऑनलाईन ॲपचा वापर करून विद्यार्थ्यांचे हेल्थकार्ड तयार करणे, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत वैद्यकीय उपचार मोफत व तातडीने उपलब्ध होण्यासाठी उपाययोजना, समुपदेशन आकांक्षित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समित्यांच्या धर्तीवर उर्वरित जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीचे गठन इत्यादीबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांची पुर्नरचना करून त्यासाठी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय सन २०२२ मध्ये घेण्यात आला आहे. दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये यामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये इ.७ वी ते १२ वीच्या विद्यार्थीनींसाठी पिंक रूमची निर्मिती करणे याबाबीचा समावेश करण्यात आला आहे.
(३) विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीबाबत सर्व शाळांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या संदर्भात शासन स्तरावर तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निळवंडे धरणातील जलवाटपाबाबत

**(३) २२८९ (१८-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४ ला दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे निळवंडे धरणातील (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) जलवाटपाच्या गंभीर समस्या निर्माण होऊन शेतकऱ्यांचा उद्रेक झाल्यामुळे दिनांक ४ व ५ मे २०२५ रोजी निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांनी पाइप फोडल्याची घटना घडली असल्याचे माहे,मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमनेर, शिर्डी, कोपरगाव व इतर परिसरात कालव्यातून पाणी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची पिके करपून गेली असून त्यामुळे आर्थिक नुकसानीची व उद्रेकाची परिस्थिती निर्माण झाली असून, निळवंडे उजवा कालवा पूर्ण होऊनही अद्याप पाणी पोहोचत नसल्यामुळे पाणी व्यवस्थापनातील अकार्यक्षमता, भ्रष्टाचार निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेच्या पार्श्वभूमीवर शासनाने निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याच्या पाण्याचे नियोजन, पाइप फुटीच्या घटना, शेतकऱ्यांवरील गुन्हे व पाण्याच्या वितरणातील गोंधळ यांची चौकशी केली आहे काय व पुढे कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

उर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या मुख्य कालव्यांची कामे पूर्ण झाली असून त्यावरील बंद नलिका वितरण प्रणालीचे कामे प्रगतीपथावर आहेत. सदरहू कामे जून, २०२८ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे क्षेत्रिय स्तरावर नियोजित आहे. सद्य:स्थितीत तात्पुरत्या स्वरूपात "टेल टू हेड" पध्दतीने गावतळे, पाझर तलाव, ओढे, नाले भरण्याचे काम करण्यात आले. सदर आवर्तनामुळे शिर्डी, कोपरगाव, संगमनेर व राहुरी मधील १९८ ओढ्यावरील बंधारे, तलाव भरण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उच्च माध्य. व्यवसाय अभ्यासक्रम अशासकीय अनुदानित संस्थेतील पदे व्यपगत करण्याच्या कामास स्थगिती देऊन कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविणेबाबत

**(४) २८६९ (१८-०७-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय यांच्या दिनांक २ मे,२०२५ च्या पत्रानुसार उच्च माध्यमिक अभ्यासक्रम अशासकीय अनुदानित संस्थेतील पदे मृत संवर्ग घोषित करण्याचे प्रस्तावित असून या पूर्वी शासनाने व्यवसाय अभ्यासक्रम गुणवत्ता वाढ व NSQF संलग्न करण्यासाठी समितीचे गठन केले व त्या समितीचा अहवाल प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २ मे,२०२५ च्या पत्रानुसार अशासकीय अनुदानित संस्थेतील पदे मृत संवर्ग घोषित करणारे पत्र रद्द करून रिक्त पदे भरणे, शिक्षक प्रात्यक्षिक पदोन्नती इत्यादी समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०३-०६-२०२६) :** (१) व (२) +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे (HSC Vocational) रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी मा.श्री.विक्रम वसंतराव काळे, विधानपरिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक १६/०३/२०२० अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालावर शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्रशासकीय स्वरूपाची माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडून दिनांक ०२/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस) या प्रक्रियेतील अडचणीमुळे प्राध्यापक लाभापासून दूर असल्याबाबत

**(५) २९७६ (१८-०७-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी "करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस)" ही पदोन्नती मिळवण्यासाठी अधिकृत व्यवस्था असूनही प्रत्यक्षात कॅस प्रक्रियेतील अनागोंदी कारभारामुळे मुंबई विद्यापिठाअंतर्गत असलेल्या महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापक हे त्यांच्या हक्काच्या लाभापासून वंचित असल्याचे दिनांक २८ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमानुसार प्राध्यापकांना पदोन्नती मिळणे आवश्यक असताना आजही पदोन्नतीसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटना (मस्ट) चे अध्यक्ष यांनी त्याच सुमारास निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कॅसची फाईल महाविद्यालयाने तपासल्यानंतर विद्यापिठात पाठवली जाते, तेथे सहाय्यक कुलसचिव,उपकुलसचिव, डीन, कुलसचिव, प्र.कुलगुरु यांच्याकडून मंजुरी प्रक्रिया नियमानुसार एका महिन्यात पूर्ण गरजेचे असताना प्रत्यक्षात तीन ते सहा महिने तर काही वेळा दोन वर्षांपर्यंत विलंब होतो, या विलंबामुळे प्राध्यापकांचे आर्थिक आणि व्यावसायिक नुकसान होते, मात्र प्रक्रियेत होणाऱ्या दिरंगाईमुळे लाभापासून वंचित रहावे लागल्याने शिक्षकांना मानसिक तणावाखाली काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कॅसमुळे पदोन्नती मिळत असल्याने शासनाने त्याबाबत विचार करुन काही बाबीं टाळण्यासाठी महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटना (मस्ट) या संस्थेशी विचार विनियमन करुन शिक्षकांना "करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस)" ही पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (११-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

विद्यापीठाचे परिपत्रक दिनांक ०१/०७/२०२४ व दिनांक १९/०८/२०२४ नुसार महाविद्यालयांकडून पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार एकूण ३८६ (मुंबई विभाग १५३ व पनवेल विभाग २३३) प्रस्तावांना विद्यापीठ स्तरावर मान्यता देण्यात आली असून सद्य:स्थितीत कोणतेही कॅसअंतर्गत पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) ३२५९ (१८-०७-२०२५) श्री.अरुण लाड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ३७२ ला दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती पारदर्शकपणे व्हावी यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती प्रक्रिया घेण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांनी या पदभरतीवर स्थगिती आणलेली होती. त्यानुसार अकृषी विद्यापीठ आणि त्याअंतर्गत असलेल्या महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकेतर पदभरतीवरील बंदी उठविण्यात यावी, अशी मागणी शिक्षक संघटनांनी शासनाकडे तसेच मा.राज्यपालांकडे केली असल्याने सदर स्थगिती आता उठविण्यात आली असून सार्वजनिक विद्यापीठे तसेच अनुदानित महाविद्यालयांमध्ये तब्बल १२५२७ प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश ठिकाणी झालेल्या प्राध्यापक भरती प्रक्रियेत गुणवत्ताधारक उमेदवारांना डावलून कमी गुणवत्तेच्या उमेदवारांना संधी देण्यात आल्याच्या तक्रारी मा.राज्यपालांकडे आल्या असून भरती प्रक्रियेतील गैरप्रकार रोखून प्राध्यापक भरतीत गुणवत्ता आणि पारदर्शकता आणावी, याकरीता सदर भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त विभागाकडून आकृतिबंध निश्चित न झालेने अकृषिक विद्यापीठातील उच्च महाविद्यालयातील प्राध्यापक भरती २०१८ पासून न केल्यामुळे १ हजार १७१ उच्च महाविद्यालयातील एकूण ११ हजार ८७ पदे रिक्त असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आकृतिबंध अंतिम न केल्याने रिक्त पदांपैकी सन २०१८ मध्ये केवळ ३ हजार ५८० प्रध्यापकांची भरती केली होती परंतु अद्यापही एकूण पदांपैकी ४०% म्हणजेच ४४३५ पदे रिक्त असून ती पदे भरण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे परवानगी मागितली असून मान्यता न मिळाल्याने प्राध्यापक भरती थांबली असल्याने मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने आध्यासनाचा संपूर्ण

ताण तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांवर येत आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रलंबित प्राध्यापकांची भरती मंजूरी देऊन उक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील शिक्षकीय पदांच्या ८० टक्के पदांच्या भरती प्रक्रिया राबविण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांची मान्यता घेऊन दिनांक २८/०२/२०२५ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक विद्यापीठांमधील पदभरती प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये सुधारीत कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील एकूण १४९८ पदे तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ११९१८ इतकी पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील एकूण १४९८ पदे तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ११९१८ इतकी पदे रिक्त आहेत
(४) हे खरे नाही.

दिनांक ०३/१०/२०१८ च्या शासन निर्णयानुसार अनुदानित महाविद्यालयांतील रिक्त पदांपैकी ४० टक्के (३५८०) सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ३०८६ पदे भरण्यात आलेली असून उर्वरित ४९४ पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सन २०१८ ते २०२४ या कालावधीत रिक्त झालेल्या ५०१२ सहायक प्राध्यापकांच्या भरतीस शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(५) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठातील १४९८ रिक्त पदांपैकी शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये ६५९ पदांना व शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये २८ पदांना अशा एकूण ६८७ पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आली आहे.

अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील रिक्त झालेल्या ५०१२ सहायक प्राध्यापकांच्या भरतीस शासन निर्णय दिनांक ११/०२/२०२६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) ३६६५ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा उपनिबंधक कार्यालयासाठी १२३ पदे मंजूर असून विद्यमान स्थितीत या कार्यालयात गट "अ"

ते गट "ड" वर्गातील ८१ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालयामार्फत जिल्ह्यातील ६०१ सेवा सहकारी संस्थांसह सहकारी वित्तीय संस्था, पतपेढी, शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध संस्था, बाजार समिती व सहकार क्षेत्रातील इतर संस्थांची कामे करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या पीककर्जाच्या वितरणाचा लेखाजोखा व सावकारी कर्जाची माहिती सदर कार्यालयामार्फत संकलित करण्यात येते तसेच शासनाच्या पणन व सहकार विभागांच्या विविध योजनांचे कार्यान्वयन या कार्यालयाकडून केल्या जाते. परंतु, सदर कार्यालयात ४२ पदे रिक्त असून अमरावती तालुका उपनिबंधकांचे पददेखील रिक्त आहे तसेच गट "ब" संवर्गातील एक पद रिक्त असून सदरचे पद मंजूर असतानाही ते पद भरण्यात आलेले नसल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०९-०६-२०२६) :** (१) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व त्यांचे अधिनस्त कार्यालयासाठी गट-अ ते गट-ड संवर्गाची १२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत ८७ पदे भरली आहेत.
(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व त्यांचे अधिनस्त कार्यालयासाठी १२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ८७ पदे भरली असून ३६ पदे रिक्त आहेत. शासन आदेश दिनांक २६/०६/२०२५ अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती तालुका हे पद भरण्यात आले आहे. तसेच गट- ब संवर्गाचे सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.अंजनगावसुर्जी हे पद दिनांक २८/०४/२०२५ पासून रिक्त आहे.
(३) शासनाने राज्यात सहकार विभागातील वर्ग-३ संवर्गात एकूण ७५८ पदे भरती केलेली असून त्यापैकी अमरावती जिल्ह्यामध्ये ०७ कर्मचाऱ्यांना पदस्थापना देण्यात आली असून गट अ संवर्गातील एक पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम बंद करण्यात आल्याबाबत

**(८) ३६६६ (१८-०७-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१७-१८ मध्ये अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या पुढाकाराने विद्यापीठात इतिहास, राज्यशास्त्र, वाणिज्य व अर्थशास्त्र या अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर शाखा सुरु करण्यात आल्या तथापि, विद्यापीठातील सदर चार शाखांचे अभ्यासक्रम बंद करण्यात आल्यामुळे विद्यापीठात उपलब्ध सुविधांपासून विद्यार्थ्यांना वंचित राहण्याची वेळ आली असल्याचे दिनांक १९ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठे ही स्वायत्त संस्था असल्याने अभ्यासक्रम सुरू करणे किंवा बंद करणे याबाबतचे निर्णय घेण्याचा अधिकार विशेषतः स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमांच्या बाबतीत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेला असतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संत गाडगेबाबा विद्यापीठामध्ये आर्थिक भार येत असल्यामुळे सदर चारही अभ्यासक्रम बंद करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने मंजूरी दिली असल्याचे स्पष्टीकरण विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यापीठाने केलेला खुलासा लक्षात घेता, विद्यापीठाने कोणते अभ्यासक्रम केंव्हा सुरु करावे व बंद करावेत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

विद्यापीठात सुरू करण्यात आलेल्या इतिहास, राज्यशास्त्र, वाणिज्य व अर्थशास्त्र अभ्यासक्रम हे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अनुदानित तसेच विनाअनुदानित काही महाविद्यालयांमध्ये देखिल उपलब्ध आहेत. सदर अभ्यासक्रमास कमाल मंजूर विद्यार्थी संख्येकरीता आवश्यक प्रवेश या होत नसल्याने, महाविद्यालयांमध्ये देखिल जागा रिक्त राहत असल्याने तसेच सदर अभ्यासक्रम बंद केल्याने विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने सदर अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून थांबविण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर यांनी ईस्ट पॉईंट स्कूल, खरबी, नागपूरचा पुनर्सलग्नतेचा प्रस्ताव विलंबाने मंजूर केल्याबाबत

**(९) ४६५९ (०१-११-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाच्या पुनर्सलग्नतेसाठी अर्जाची पडताळणी करा, असा विनंती अर्ज ईस्ट पॉईट स्कूल, खरबी, नागपूरच्या प्राचार्यांनी दिनांक २ मे, २०२५ रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर यांना दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळेच्या अस्तित्वाशी निगडीत विषयाचे गांभीर्य लक्षात न घेता, सततच्या पाठ पुराव्यानंतर आणि विधानपरिषद सदस्यांच्या विनंतीनंतरही ८९ दिवसानंतर शाळाभेटीचे आयोजन करण्यात आले असूनही दिनांक ३० जुलै, २०२५ रोजी पार पडलेल्या शाळाभेटीचा अहवाल गैरहेतु मनात ठेवून पडताळणी अहवाल २९ दिवसानंतर म्हणजेच दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ रोजी दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. नागपूर यांच्या बेजबाबदार कार्यशैलीमुळे दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्थेला पुनर्सलग्नतेकरीता झालेल्या विलंबाबद्दल कोणती कार्यवाही केली तसेच सदर विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधिताविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ईस्ट पॉईंट स्कुल, खरबी, नागपूर या शाळेचा दिनांक ०२/०५/२०२५ रोजीचा स्वयंअर्थसहाय्यीत तत्त्वावर पुर्नसंलग्नतेचा प्रस्ताव दिनांक १९/०६/२०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयास प्राप्त झाला. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित शाळेची दिनांक २९/०८/२०२५ रोजी तपासणी करून शाळा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दिनांक १६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये ईस्ट पॉईंट स्कुल, खरबी, नागपूर या शाळेस पुर्नसंलग्नता प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अंतर्गत करार तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१०) ६७०८ (१७-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अंतर्गत करार तत्त्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजित करण्याच्या मागणीसाठी समग्र शिक्षा संघर्ष समिती यांच्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या काळात यशवंत स्टेडियम, नागपूर येथे आमरण उपोषण करण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमित शासन निर्णयानुसार समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत असलेल्या ३१०५ कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत कायमस्वरूपी समायोजन करण्यात आले असून समग्र शिक्षा अंतर्गत कार्यरत असलेल्या ३३७८ वरिष्ठ कर्मचारी अद्यापही शासन सेवेत समायोजनाच्या प्रतीक्षेत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ३३७८ वरिष्ठ कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या अभ्यास समितीने दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार शालेय शिक्षण विभाग, ग्रामविकास विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील समकक्ष पदांवर समायोजन करण्याबाबत सकारात्मक व स्पष्ट शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर अभ्यास समितीच्या स्पष्ट शिफारशी असूनही शासनाकडून आजतागायत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही यामागे कोणती प्रशासकीय, आर्थिक अथवा धोरणात्मक कारणे आहेत,

(५) असल्यास, सदर ३३७८ वरिष्ठ कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समग्र शिक्षा समावेशित शिक्षण या उपक्रमांतर्गत कार्यरत २५७२ विशेष शिक्षकांचे समायोजन शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या स्तरावरून शासन निर्णय, दिनांक ०८/१०/२०२४ अन्वये विहीत निकष व कार्यपध्दतीचा अवलंब करून मान्यता देण्यात आली आहे.

तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक २२/०७/२०२४ रोजीच्या बैठकीतील प्राप्त निर्देशांनुसार, समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात शिफारशी करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पार–गोदावरी एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याबाबत

**(११) ६७८१ (१८-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९ ला दिनांक ४ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नार–पार खोऱ्यातील अतिरिक्त पाणी, पाण्याची तूट असलेल्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी पार–गोदावरी एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याची मागणी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी किंवा त्यासुमारास शासनाकडे निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यासाठी वरदान ठरणाऱ्या नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामांसाठी जलसंपदा विभागाने ४,११६ कोटी रुपयांची निविदा काढली असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, कामात होत असलेल्या विलंबामुळे प्रकल्पाच्या मूळ अंदाजित खर्चात मोठी वाढ होऊन शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्यास अडथळा निर्माण झाला असून, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना सिंचनाअभावी मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून या प्रशासकीय दिरंगाईमुळे राज्याच्या हक्काचे १०.७६ टीएमसी पाणी अरबी समुद्रात वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सुचविलेले पर्याय तपासून ते आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत मा.मंत्री, जलसंपदा विभाग यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी किंवा त्यासुमारास मुख्य अभियंता, नदी जोड प्रकल्प, नाशिक यांना निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, निर्देशांच्या अनुषंगाने पार–गोदावरी एकात्मिक नदी जोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी तसेच मागील अनेक वर्षापासून या प्रकल्पाची प्रलंबित असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नदी जोड प्रकल्पाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नार-पार-गिरणा नदी जोड प्रकल्पास महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०५/०९/२०२४ अन्वये नार-पार-गिरणा नदी जोड योजनेस एकूण रुपये ७४६५.२९ कोटी किंमतीची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. नार-पार-गिरणा नदी जोड योजनेंतर्गत रुपये ४११६.१० कोटी निविदा

कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) होय.
(५) उपरोक्त बैठकीत दिलेल्या निर्देशांनुसार पार गोदावरी नदी जोड योजनेसाठी पाणी उपलब्धतेची मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांचेकडून खातरजमा करून योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेबाबत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित शाळांना आमदार स्थानिक विकास निधी देण्याबाबत

**(१२) ६८०४ (१७-०३-२०२६) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील स्वयं-अर्थसहाय्यित शाळा व कॉन्व्हेंट शाळांना आमदारांचा स्थानिक विकास निधी दिला जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वयं-अर्थसहाय्यित व कॉन्व्हेंट शाळांमधील शिक्षक हे पात्र शिक्षक मतदार असून त्यांच्या मतांद्वारे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमार्फत या शाळांचा शैक्षणिक व भौतिक विकास होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वयं-अर्थसहाय्यित शाळांना शालेय दैनंदिन खर्च, कर्मचारी वेतन, देखभाल-दुरुस्ती व इतर अनुषंगिक खर्च स्वतःच्या उत्पन्नातून पूर्ण करावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, स्वयं-अर्थसहाय्यित शाळा व कॉन्व्हेंट शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांना आमदार स्थानिक विकास निधी देण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे, तसेच यासंदर्भात शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-०६-२०२६) :** (१) नाही, याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील कलम ५ मधील तरतुदीनुसार स्वयंअर्थसहाय्यित शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च शाळा व्यवस्थापन स्वतः करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही अनुदान किंवा वित्तीय साहाय्य अनुज्ञेय राहणार नाही.
त्यामुळे या शाळांना स्थानिक विकास निधींतर्गत निधी अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बिगर नेट/सेट प्राध्यापकांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(१३) ६८१० (१८-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागातील दिनांक २३ ऑक्टोबर, १९९२ ते दिनांक ३ एप्रिल, २००० या कालावधीत बिगर NET/SET पात्रतेवर नियुक्त करण्यात आलेल्या अध्यापकांना जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना (Old Pension Scheme) लागू करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ४ एप्रिल, २००० नंतर बिगर NET/SET पात्रतेवर नियुक्त करण्यात आलेल्या प्राध्यापकांना अद्याप जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी बिगर NET/SET पात्रतेवर नियुक्त करण्यात आलेल्या प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २९/१०/२०२१ अन्वये दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्यात आलेल्या असल्याने अशा अध्यापकांना त्यांचा मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राह्य धरुन तत्कालीन प्रचलित धोरणानुसार सेवानिवृत्ती वेतन देय राहील असा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बिगर नेट/सेट अध्यापकांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राह्य धरुन सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत याचिका क्र.१३१६६/२०१७ मध्ये मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे.

मा.न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार शासन निर्णय दिनांक २९/१०/२०२१ अन्वये दिनांक २३/१०/१९९२ ते दिनांक ०३/०४/२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट प्राध्यापकांना सेवानिवृत्तीवेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना एम.फिल/पीएच.डी. साठी प्रोत्साहन वेतनवाढ लागू करण्याबाबत

**(१४) ६९४६ (१८-०३-२०२६) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) दिनांक १८ जुलै, २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार एम.फिल. व पीएच.डी.धारक प्राध्यापकांना प्रोत्साहनात्मक वेतनवाढ देय असताना, राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांना एम.फिल/पीएच.डी.करीता प्रोत्साहन वेतनवाढ लागू करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार, अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याच्या उद्देशाने दिनांक ७ ऑक्टोबर, २०२१ व २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी शासनाने समिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीमध्ये शिक्षक, पदवीधर प्रतिनिधी, अधिकारी व विविध संघटनांचे पदाधिकारी असे एकूण ३३ सदस्य असून, या समितीच्या दिनांक ६ जानेवारी, २०२२ व २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी बैठका संपन्न झाल्या असून उपरोक्त समितीने आपल्या शिफारशींमध्ये अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांना एम.फिल. व पीएच.डी. करीता प्रोत्साहन वेतनवाढ पूर्ववत लागू करण्याची स्पष्ट शिफारस शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांना एम.फिल. व पीएच.डी. करीता प्रोत्साहन वेतनवाढ पूर्ववत लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सद्याच्या वेतन संरचनेमध्ये प्रोत्साहन भत्याचा (Incentive) समावेश असल्याने एम.फिल. व पीएच.डी. करीता प्रोत्साहन वेतनवाढ दिली जाणार नसल्याबाबत केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सूचना दिली आहे. सदर बाब विचारात घेता नमूद शिफारस अमान्य करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरिष्ठ महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांना १२ वर्षे व २४ वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर लागू करण्याबाबत

**(१५) ७१४९ (१८-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांमधील प्रयोगशाळा सहाय्यकांना १२ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर ₹४२०० आणि २४ वर्षांची सेवा पूर्ण केल्यानंतर ₹४३०० ग्रेड पे लागू करण्यात येत असून सदर लाभ राज्यातील विविध विभागांमध्ये दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर विभागामध्ये मात्र प्रयोगशाळा सहाय्यकांना सदर ग्रेड पेचे लाभ दिले जात नसल्याची वस्तुस्थिती आहे, हे ही खरे आहे काय, तसेच नागपूर विभागामधील प्रयोशाळा सहाय्यकांना सदर ग्रेडपेचा लाभ न देण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, नागपूर विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांमधील प्रयोगशाळा सहाय्यकांना १२ वर्षांनंतर ₹४२०० व २४ वर्षांनंतर रुपये ४३०० ग्रेड पे लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापिठे व संलग्नित महाविद्यालये यामधील प्रयोगशाळा सहायकांची वेतनश्रेणी शासन निर्णय दिनांक २२/०९/२०२५ अन्वये ५ व्या वेतन आयोगामध्ये रुपये ४०००-६००० अशी करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे वेतनश्रेणी लागू केल्यानंतर त्यानुसार आश्वासित प्रगती योजनेंतर्गत १२ व २४ वर्षाच्या लाभासाठी लागू होणाऱ्या वेतनश्रेणीबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या निर्देश संचालक,उच्च शिक्षण यांना देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांमधील ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांच्या अत्यल्प वेतनाबाबत**

**(१६) ७२७६ (१७-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे, श्रीमती चित्रा वाघ : दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५६८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांपैकी ‘अ’ वर्ग ग्रंथालयांमधील ग्रंथपालांना दरमहा सुमारे ₹१६,००० ते ₹१६,८०० इतके वेतन मिळत असून, ग्रामीण भागातील ‘ड’ वर्ग ग्रंथालयांमधील कर्मचाऱ्यांना केवळ ₹२,२०० ते ₹२,३०० इतके अत्यंत तुटपुंजे व अपुरे वेतन मिळत असल्याची बाब दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर राज्यांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांतील ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियम अथवा स्वतंत्र वेतन संरचनेच्या तुलनेने अधिक व सन्मानजनक वेतन दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सन २०२५ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयांना ४० टक्के अनुदानवाढ जाहीर केली असली, तरी सदर अनुदानवाढीसंदर्भात अद्याप अधिकृत शासन निर्णय (GR) निर्गमित करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक ग्रंथालयांमधील ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करून त्यांना किमान वेतन अथवा सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत तसेच सन २०२५ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयांना जाहीर केलेल्या ४० टक्के अनुदानवाढीचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये(सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामुग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम १९७० मधील तरतूदींनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयास परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते. ग्रंथालयांना मिळणाऱ्या सदर परिरक्षण अनुदानातील ५० टक्के रक्कम वेतनासाठी व उर्वरित ५० टक्के रक्कम वेतनेतर अनुज्ञेय बाबींवर खर्च करणे बंधकारक आहे.

कर्मचाऱ्यांच्या वेतनात पुरेशी वाढ होण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०२२ नुसार सन २०२२-२३ पासून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ६०% वाढ करण्यात आली आहे. अनुदान वाढीनंतर शासनमान्य ग्रंथालयांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ झाली आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदान दरात ४० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.शासनावर असलेला वाढीव आर्थिक भार विचारात घेता सदर प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणे योग्य होईल, असे अभिप्राय वित्त विभागाने दिले आहेत.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे नोंदणी असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून सदर नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांची व्यवस्था त्यांच्या विश्वस्तांकडून पाहिली जाते. ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे सर्वाधिकार संबंधित ग्रंथालय व्यवस्थापनास आहेत. कर्मचारी नियुक्ती, त्यांचे वेतन व तद्अनुषंगीक बाबी संबंधित ग्रंथालय संस्थेच्या अंतर्गत येत असल्याने यामध्ये ग्रंथालय संचालनालय अथवा शासनाचा थेट सहभाग नाही.

भारतात १९ राज्यांचे स्वतंत्र ग्रंथालय कायदे असून सदर कायद्यांमध्ये ग्रंथालयांची रचना,कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतनाचे स्वरुप, नियम, निकष, कामाचे तास इ. तरतूदी वेगवेगळया असल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना खाजगी सावकारांच्या जाचातून मुक्त करणेबाबत

**(१७) ७६६१ (१७-०३-२०२६) श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सावकारी जाचामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले असून सर्वसामान्य जनता विशेषत: कर्जबाजारी शेतकऱ्यांना खाजगी सावकाराच्या जाचातून मुक्त करण्यासाठी लागू केलेला महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमन २०१४ च्या महत्त्वपूर्ण कायद्यात अद्यापही त्रुटी असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमन,२०१४ च्या महत्त्वपूर्ण कायद्यातील त्रुटी दुर करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०४-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ ची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी शासन निर्णय, दिनांक ०१/०३/२०१७ अन्वये जिल्हा स्तरावर तीन सदस्यांची प्रशासकीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीमध्ये दिनांक १७/०७/२०२५ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात असून सदर समितीमध्ये (१) संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी, अध्यक्ष (२) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अथवा त्यांचे प्रतिनिधी, सदस्य व (३) संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सदस्य सचिव असे तीन सदस्य असतील.

अवैध सावकारीवर वचक ठेवण्यासाठी नियुक्त उपरोक्त जिल्हास्तरीय समितीने दर ३ महिन्यातून एकदा बैठक घेणे अनिवार्य असून तशा सूचना संबंधितांस देण्यात आल्या आहेत.

सदर अधिनियमातील विविध कलमांव्दारे गंभीर गुन्हयांसाठी विहित केलेला शिक्षेचा (कारावासाचा) कालावधी ७ वर्षापर्यंत वाढविण्यासंदर्भात अधिनियमात सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाने विहित कलेल्या दरापेक्षा एखादा सावकार अधिक दराने कर्जावर व्यज आकारत असल्याचे आढळून आल्यास सावकाराची मालमत्ता जप्त करुन सदर अधिकची रक्कम वसूल करण्याची तरतूद अधिनियमात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१८) ७८५१ (१८-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार ११,१५० पर्यंत खाली आली असून, गेल्या दोन वर्षांत जवळपास १,००० ग्रंथालये कमी झाली असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मुंबईत फक्त ५१७ आणि नागपूर विभागात केवळ ९५८ ग्रंथालये असून, राज्यातील ३२,५८८ गावांमध्ये अद्याप एकही सार्वजनिक ग्रंथालय नाहि तसेच एकूण २७,९५१ ग्रामपंचायतींपैकी २७,८२४ ग्रामपंचायतींमध्ये ग्रंथालयांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ‘गाव तिथे ग्रंथालय’ ही घोषणा असतानाही ७०% पेक्षा जास्त गावांमध्ये ग्रंथालये उपलब्ध नसल्यामुळे साक्षरता संवर्धनाच्या कामात अडचणी येत असून ग्रंथालयांच्या मूलभूत सुविधांसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) व (२) आजमितीस राज्यात ११,१५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० व सुधारणा नियम २०१२ मधील निकष/तरतूद आणि वेळोवेळी निर्गमित संबंधित

शासन निर्णयातील तरतूदींनुसार सन २०१२-१३ ते २०२४-२५ या कालावधीत १७०६ अकार्यक्षम ग्रंथालयांची शासनमान्यता रद्द करण्यात आली आहे.

मुंबई विभागात एकूण ५१८ ग्रंथालये असून नागपूर विभागात एकूण ९५८ ग्रंथालये आहेत.

राज्यात सुमारे ४२,००० गावे असून ग्रामीण व शहरी भाग मिळून ११,१५५ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत.

(३) 'गाव तिथे ग्रंथालय' ही योजना नसून संकल्पना आहे.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना मागील वर्षी केलेल्या अनुज्ञेय बाबींवरील प्रत्यक्ष खर्चावर आधारित एकूण मान्य खर्चाच्या ९० टक्के इतके वा त्या ग्रंथालयाच्या वर्गासाठी असणारे कमाल अनुदान यापैकी जी रक्कम कमी तितके परिरक्षण अनुदान दरवर्षी देण्यात येते.

राज्य सरकार व राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, कोलकता यांच्या समान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना वेळोवेळी निधी उपलब्ध करून करुन दिला जातो. त्यामध्ये ग्रंथालयांना इमारत बांधकाम, फर्निचर,संगणक, प्रिंटर झेरॉक्स मशीन, ग्रंथ यासारख्या सुविधेत वाढ होण्याच्या अनुषंगाने सहाय्य करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील क्रीडा स्पर्धासाठी स्पर्धकांच्या निवासासाठी वसतिगृह रिकामे करण्याचे निर्देश दिल्याबाबत

**(१९) ८००२ (१८-०३-२०२६) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये सन २०२५-२६ मध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातील सुमारे ४,५०० स्पर्धक सहभागी होणार असल्याने त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ प्रशासनाने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आठ दिवसांच्या आत तात्पुरते वसतिगृह रिकामे करण्याचे निर्देश दिले असल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी सदर निर्णयास विरोध दर्शविला असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयास विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविला असतानाही त्याची दखल न घेता वसतिगृह रिकामे करण्याचे निर्देश देण्यात आल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये याकरीता विद्यापीठ प्रशासनाने वा शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०८-०६-२०२६) :** (१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक ४ ते ८ डिसेंबर, २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये सुमारे ४,५०० स्पर्धक सहभागी होणार असल्याने त्यांच्या निवास व्यवस्थेसाठी विद्यापीठाने नियोजन केले होते. यासाठी विद्यापीठ परिसरातील वसतिगृहांचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

सदर निर्णय घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांना दिनांक १९ जून, २०२५ रोजी पूर्वसूचना देण्यात आली होती. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थी संघटनांशी चर्चा करून त्यांना पुरेसा कालावधी उपलब्ध करून देण्यात आला होता.तथापि, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांची निवास व्यवस्था विद्यापीठ परिसरातच करण्यात आली होती.
(२) विद्यापीठ प्रशासनाने ज्या विद्यार्थ्यांना क्रीडा महोत्सवादरम्यान वसतिगृह रिकामे करणे शक्य नव्हते, अशा विद्यार्थ्यांसाठी पर्यायी निवास व्यवस्था केली होती. तसेच विद्यार्थिनींची निवास व्यवस्था विद्यापीठ परिसरातच करण्यात आली होती.
विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक पर्यायी उपाययोजना करण्यात आल्याने स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी शिकवणी वर्गांसाठी मार्गदर्शक नियमावलीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२०) ८२२४ (१८-०३-२०२६) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांवरील वाढता मानसिक ताण लक्षात घेऊन राज्य शासनाने शाळा आणि खाजगी शिकवणी वर्गांसाठी जानेवारी २०२६ मध्ये मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गदर्शक सूचनांना खाजगी शिकवणी वर्ग चालकांकडून विरोध दर्शविण्यात आला असून, केवळ खाजगी शिकवणी वर्गांवर निर्बंध घालण्याऐवजी सरकारी शाळांमधील गुणवत्तेच्या, शिक्षक उपलब्धतेच्या व पायाभूत सुविधांच्या समस्यांकडे शासनाने अधिक लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियमावलीतील रविवारची सक्तीची सुट्टी, विद्यार्थ्यांच्या निकालांची गोपनीयता तसेच शिकवणी वर्गांच्या वेळांबाबतच्या तरतुदींच्या अंमलबजावणीवरून संबंधित घटकांमध्ये वाद निर्माण झाला असून, त्यामुळे शासनाच्या विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्याच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने खाजगी शिकवणी वर्ग, शाळा, पालक व तज्ज्ञ यांच्याशी सल्लामसलत करून सदर नियमावलीत आवश्यक त्या सुधारणा करुन विद्यार्थ्यांच्या हितासाठी सदर नियमावलीची कडक व प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

(४) खाजगी शिकवणी वर्गावर नियंत्रण ठेवण्याकरीता केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, अन्य राज्यांनी केलेले अधिनियम/नियम विचारात घेऊन राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाकरीता सर्व समावेशी “खाजगी शिकवणी (विनियमन) अधिनियम, २०२६” तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.